दि.24 मे 2022

## आंतरराष्ट्रीय वेबीनार

# "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव: संधी आणि आव्हाने"

## अहवाल

दि.24 मे 2022 रोजी जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संधी आणि आव्हाने" या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्य लढ्याने आशिया आणि आफ्रिकेतील देशांना स्वतंत्रता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित केले होते. वर्तमान स्थिती मध्ये देशाची नवी पिढी देशाने आम्हाला काय दिले हा प्रश्न करते. मुळात त्यांना या आपल्या देशाचा इतिहास माहीत नाही. देशातील सर्वांना आपल्या देशाचा महान इतिहास माहित असणे गरजेचे आहे. त्यामुळे या अमृत महोत्सवाच्या माध्यमातून स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास प्रत्येक घटकासमोर ठेवणे आवश्यक आहे. याच दृष्टीने झालेल्या या वेबिनार चे उद्घाटक मा. श्री. रणवीरराजे पंडित हे होते. तर बीजभाषक म्हणून प्राचार्य डॉ. वसंत बिरादार महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर हे उपस्थित होते. या वेबिनारचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अभिजय पाटणे शिकागो, अमेरिका तर दुसरे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रशांत अमृतकर अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांची उपस्थिती होती. अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे लाभले होते.

वेबिनारचे उद्घाटक मा.श्री रणवीरराजे पंडित यांनी असे प्रतिपादन केले की, भारताला जगाच्या तुलनेत उभे करायचे असेल तर प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून वर्तन करणे गरजेचे आहे. इतिहासाच्या आधारे अनुभवातून नवनव्या संकल्पनांची मांडणी करता येईल व सामर्थ्यशाली भारताला आणखी सशक्त लोकशाही प्रणालीचा देश म्हणून पुढे आणता येईल. गेल्या 75 वर्षाच्या काळाचे वर्णन करताना आपला विकास पुन्हा तपासून पहावा लागेल. राजकीय,सामाजिक स्वातंत्र्याचे विस्तारीकरण करून त्याला सार्वत्रिक व सार्वजनिक करण्याचे मोठे आव्हान आपल्यासमोर आहे.

वेबीनारचे बीजभाषक म्हणून बोलत असताना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांनी पुढील काळात येणारे लोकसंख्येचा विस्फोट, पर्यावरणाचा असमतोल, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार आणि सुजन राजकारण्यांचा अभाव ही आव्हाने आहेत. ती पार करून भारताने जगाला कवेत घ्यावे तरच स्वातंत्र्याच्या शताब्दी कडील वाटचाल समृद्ध होईल. एकात्मतेची भावना वृद्धिंगत होऊन माझा देश व मी या देशाचा अशी भावना प्रत्येकाच्या मनात तयार व्हावी. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संधी आणि आव्हाने या दोन्हींचा योग्य समन्वय साधत अनमोल मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे म्हणून शिकागो, अमेरिका येथून उपस्थित असलेले प्रा डॉ अभिजय पाटणे यांनी स्वातंत्र्याची व स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपले बलिदान दिले त्यांची आत्ताच्या पिढीला

जाणीव व्हावी व त्या आधारे भावी काळाकडे त्यांनी डोळसपणे पहावे. आपल्यामध्ये एक सुजाण नागरिक म्हणून आणखीही काही अपेक्षीत सकारात्मक बदल व्हायचे आहे ते इथेच व्हावेत म्हणून हे वर्ष आपण साजरे करत आहोत. ज्यांना या सर्व गोष्टींचे महत्त्व समजते त्यांनी हा इतिहास जागृत ठेवण्याचे व इतरांच्या मनामध्ये देशभावना जागृत करण्याचे काम अविरत करावे असे आवाहन त्यांनी केले. या वेबीनारचे दुसरे प्रमुख पाहुणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत अमृतकर यांनी स्वातंत्र्यानंतर भारत कसा बनत गेला व लोकशाहीने या 75 वर्षात कसा विकास साधला. हे सांगून भारत केवळ बाजारपेठच नाही तर जगातले सर्वात मोठे इंडस्ट्रियल हब तयार होत आहे. बहुसंख्यांक विरुद्ध अल्पसंख्यांक अशी जी ध्रुवीय राजकारणाची स्थिती तयार होत आहे, याविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यासाठी सर्वांना सामावून घेणारी दूरदृष्टी तयार होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

अध्यक्ष म्हणून बोलत असताना प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी भारताला जगात नाव मिळवायचे असेल तर स्वातंत्र्यलढा आणि त्यामध्ये योगदान देणाऱ्या बरोबरच बलिदान देणाऱ्या वीरांचे स्मरण करणे गरजेचे आहे असे सांगितले. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पातळीवर समता, स्वातंत्र्य आणि मानवता या मूल्यांचे बीजारोपण होण्यासाठी हा अमृतमहोत्सव असल्याचे त्यांनी सांगितले. या आंतरराष्ट्रीय वेबीनारचे प्रास्ताविक डॉ. संतोषकुमार यशवंतकर यांनी केले पाहुण्यांचा परिचय डॉ.जाहेद सिद्दिकी यांनी करून दिला आभार ग्रंथपाल श्रीमती ज्योती रकटे यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ.आयोध्या पवळ यांनी केले. या चर्चासत्रामध्ये महाराष्ट्रासह भारतातील बहुसंख्य राज्यातून व आंतरराष्ट्रीय स्तरावरुन बहुसंख्येने संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी झूम, युट्युब व फेसबुक द्वारे सहभागी झाले होते.

Principal
Arts & Science College,Shivajinag
Gadhi, Tq.Georai Dist.Beed